REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ पुणें, बुधवार तारीख ७ एप्रिल १९४८ अंक १३

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिसः—पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, ओझर ( जि. नाशिक ), खोपोली पे ऑफिसः

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | ... | रु. ७,९३,८१० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ३,९६,१४५ |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ५५ लाखांचेवर |

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B. (वकील)

- गतवर्षी ऑर्डिनरी शेअर्सवर चार टक्के अधिक अर्धा टक्का करमाफ डिव्हिडंड दिलें.
- मुंबई, नगर, नाशिक, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे ठिकाणीं डिमांड ड्राफ्टस् दिले जातात.
- बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एन. एन. क्षीरसागर,
आर. बी. साळवेकर,
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.

## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. ४८३ | " Cencobank " | नं. ५११ |

मुख्य कचेरीः—लक्ष्मी रोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातातः—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

कार्ड पाठवून व्ही. पी. नें मागवा रक्तवर्धक खुराक **आंबावडी** फडके प्रॉडक्टस् नागनाथ पार, पुणें.

**नं. २० साबण** बार सोप आणि वडी वापरा

माणिक सोप वर्क्स, कराड ( जि. सातारा )

## विविध माहिती

**पाकिस्तानला साखरेचा पुरवठा**-- पाकिस्तानला साखर मिळणें कठीण जात आहे. पाकिस्तानची वार्षिक गरज २ लाख, ४५ हजार टनांची आहे. खुद्द पाकिस्तानांत फक्त २५ हजार टन साखर तयार होते. हिंदुस्थानांतून पाकिस्तानला १५ हजार टन साखर देण्यांत येणार आहे. पाकिस्ताननें ब्राझिल आणि क्यूबाकडून १९ हजार टन साखर आयात केली आहे. हिंदुस्थानांतील साखर महाग असल्यानें क्युबासारख्या देशांतून साखर आणण्याचे प्रयत्न पाकिस्तान सरकार करीत आहे. तथापि हुंडणावळीच्या अडचणीमुळें हीं आयात करणें कठीण जात आहे.

**आगबोटींचे बाबतींत अमेरिकेचें अग्रस्थान**—अमेरिकन आगबोटींमध्यें युद्धकाळांत फारच 'मोठी म्हणजे २३८·६% वाढ झाली आहे. २ कोटी, १३ लक्ष टन आगबोटींची ८ वर्षांत भर पडली आहे. जगांतील एकूण आगबोटींपैकीं ३६·१% आगबोटी अमेरिकेच्या मालकीच्या आहेत; ग्रेट ब्रिटनकडे २१·४% आगबोटींची मालकी आहे. १९०१ सालीं हेच आकडे अनुक्रमें ४·७% व ५०% असें होते. ह्यावरून ग्रेट ब्रिटनला मागें सारून अमेरिका कशी पुढें सरसावली आहे, हें दिसून येईल. पनामा, रशिया, कॅनडा, चीन, अर्जेंटिना, स्वीडन, स्पेन व होंडुरास ह्या देशांच्याहि आगबोटींचे ताफे वाढले आहेत.

**पोस्टाचें वाढतें जाळें**—हिंदुस्थान सरकार २ हजार अगर अधिक वस्ती असलेल्या खेड्यांतून पोस्ट ऑफिसें उघडणार आहे. एखाद्या खेडगांवांतील पोस्ट उघडणें खर्चाच्या दृष्टीनें परवडणार नसेल तर त्यासाठी वार्षिक ५०० रुपये नुकसान सोसूनही सरकार तेथें पोस्ट उघडणार आहे' चार मैल घेराच्या आंतील खेड्यांच्यासाठी उघडण्यांत यावयाच्या पोस्टासाठी सरकार वार्षिक ७५० रुपये पर्यंतहि नुकसान सोसण्यास तयार आहे.

**कोळशाच्या बदला जपानी चात्या**--जपानला ३० हजार टन कोळसा देऊन सूत कातण्याच्या १ लाख चात्या घेण्याच्या वाटाघाटी यशस्वी झाल्या आहेत. ह्या चात्या नव्या गिरण्या उभारण्याचे परवाने मिळालेल्या कंपन्यांना देण्यांत येणार आहेत.

**रोडस काँग्रेसचें अधिवेशन**–इंडियन रोड्स काँग्रेसचें १२ वें अधिवेशन रूरकी (सं. प्रांत) येथें ता. ९ रोजीं सुरू होणार आहे. श्री. चिंतामण गोविंद काळे हे अध्यक्ष आहेत.

**आंतरराष्ट्रीय कपास परिषद**—कैरो येथें ता. १ ते ता. ८ एप्रिल, आंतरराष्ट्रीय कपास परिषद भरत आहे. तिला उपस्थित होण्यासाठी हिंदुस्थानातर्फे श्री. आर. जी. सरय्या ( मुंबई प्रां. सहकारी बँकेचे चेअरमन ), श्री. सी. एस. पटेल, डॉ. व्ही. जी. पानसे व श्री. एन. जी. अभ्यंकर ह्यांची निवड झाली आहे. ३० देशांचे प्रतिनिधी परिषदेंत भाग घेत आहेत.


# दि डेक्कन पॉटरीज अँड अलाईड इंडस्ट्रीज, लि.

अधिकृत भांडवल रु. २०,००,०००
( वीस लाख रुपये )
रु. ५० चा एक शेअर याप्रमाणें
एकूण ४०,०००
ऑर्डिनरी शेअर्समध्यें विभागलें आहे.

विक्रीस काढलेलें भांडवल
रु. ५,००,००० ( पांच लाख रुपये )
रु. ५० चा एक शेअर याप्रमाणें
एकूण १०,०००
ऑर्डिनरी शेअर्समध्यें विभागलें आहे.

चेअरमन—रावबहादुर गणेश गोपाळ शेंबेकर, जमीनदार, बारामती
फॅक्टरी—चिंचवड, जी. आय्. पी. रेल्वे स्टेशनजवळ
तारेचा पत्ता—'पॉटर्स', पूना

★ मुख्यत: कपबशा, बरण्या, कौलें, फ्लोअरिंग टाइल्स वगैरे नित्योपयोगी मालाच्या उत्पादनासाठीं स्थापन झालेला महाराष्ट्रांतील मोठ्या प्रमाणावरील पहिलाच कारखाना.
★ वजनदार, अनुभवी व तज्ज्ञ संचालक मंडळ.
★ पॉटरीतज्ज्ञ मॅनेजिंग एजन्सीचे भागीदार.
कंपनीच्या कपबशा बाजारांत पाडण्याचे शुभमुहूर्तावर.

शेअर वगैरेसाठीं कंपनीचे रजिस्टर्ड ऑफिसचे पत्त्यावर पत्रव्यवहार करावा अगर समक्ष भेटावें.

रजिस्टर्ड ऑफिस :
१९६।३९ सदाशिव पेठ, फणसळकर बंगला,
टिळक रोड, पुणें नं. २

मॅ. एजन्टस् :
मेसर्स नॅशनल ट्रेडिंग कंपनी

-सर्व प्रांतांतील-
सुती - गरम - रेशमी
—खादीचें माहेरघर—

# खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २

आमचे सर्व हितचिंतकांस नवीन वर्ष सुखाचें जावो.

# अर्थ

बुधवार, ता. ७ एप्रिल १९४८





प्रो. वा. गो. काळे


संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## सहकारी चळवळीची पुनर्घटना

### शेतीच्या धंद्यास भांडवलाची मदत

#### मुंबई सरकारच्या योजनांचें दिग्दर्शन

सहकारी पतपेढ्यांना भांडवलाची मदत करण्यासाठीं ॲग्रिकल्चरल क्रेडिट कॉर्पोरेशन स्थापणें मुंबई प्रांतांत आवश्यक आहे काय? ह्या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं सर मणिलाल नाणावटी ह्यांच्या अध्यक्षत्वाखालीं एक कमिटी नेमण्यांत आली होती. "अशा कॉर्पोरेशनच्या स्थापनेची जरूरी नाहीं; तिचें कार्य सध्याच्या सहकारी संघटनेमार्फतच आवश्यक त्या पुनर्घटनेनंतर आणि सरकारी मदतीनें करवितां येईल" असा कमिटीचा अभिप्राय पडला आणि तो मुंबई सरकारनें मान्य केला आहे. अशा रीतीनें, प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांच्या अध्यक्षतेखालील कमिटीच्या मुख्य शिफारसीस मुंबई प्रांतापुरती तरी, निदान तूर्त कलाटणी मिळाली आहे. नाणावटी कमिटीच्या इतरहि शिफारशींस अनुसरून मुंबई सरकारनें सहकारी चळवळीच्या प्रगतीच्या दृष्टीनें हुकूम व सूचना केल्या आहेत.

खेडेगांवांत फक्त मल्टिपर्पज सोसायट्याच ह्यापुढें नोंदविण्याचें सरकारचें धोरण राहील आणि सध्यां अस्तित्वांत असलेल्या सोसायट्यांचें मल्टिपर्पज सोसायट्यांत रूपांतर करण्याचा शक्य तो प्रयत्न केला जाईल. मर्यादित जबाबदारीच्या सोसायट्यांचें अमर्यादित जबाबदारीच्या व अमर्यादित जबाबदारीच्या सोसायट्यांचें मर्यादित जबाबदारीच्या सोसायट्यांत रूपांतर आतां होऊं शकेल. मोठालीं कर्जें देतां यावीं, ह्यासाठी बड्या शेतकऱ्यांना मर्यादित जबाबदारीची पतपेढी काढतां येईल. एकाच वेळीं मंजूर कर्जाची सबंध रकम न घेतां जरूरीप्रमाणें ती हप्त्यांनीं घेणें शेतकऱ्यांना शक्य होईल. उभ्या पिकावरील कर्जाचीहि तरतूद आवश्यक आहे. कॅशक्रेडिट स्वरूपाची पद्धतहि सुरू केली पाहिजे.

सहकारी सोसायट्यांच्या कर्जाची वसुली सुकर करण्यासाठी उपाययोजना जरूर आहे. लँड मॉर्गेज बँकांची ह्या संबंधांतील पद्धति उचलण्याजोगी आहे. स्पेशल रिकव्हरी अधिकारी रजिस्ट्रारनें नेमावे व त्यांचेवर देखरेख करावी अशीहि एक सूचना आहे. व्याजाचे दर, व्यवस्थाखर्च, इत्यादि संबंधांतील नाणावटी कमिटीच्या शिफारशींकडे रजिस्ट्रारचें लक्ष वेधण्यांत आलें असून सोसायट्यांस त्या अंमलांत आणण्यास सांगितलें जाईल. कर्ज देण्यास लायक अशा आणखी ८ लक्ष शेतकऱ्यांना सहकारी संघटनेंत पूर्णपणें आणण्यास १० वर्षें तरी लागतील असें कमिटी म्हणते; परंतु गरजू शेतकरी पुनः सावकाराच्या भक्ष्यस्थानीं पडूं नये ह्याकरितां सहकारी चळवळीची प्रगति सत्वर घडवून आणण्यास प्रोत्साहन देण्याचें सरकारचें धोरण राहील.

प्रांतिक सहकारी लँड मॉर्गेज बँकेचें प्रांतिक सहकारी बँकेमध्यें विलिनीकरण करूं नये, ही कमिटीची शिफारस सरकारास मान्य आहे. नवीन लँड मॉर्गेज बँका काढण्यांत येऊं नयेत ही शिफारसहि ठीक आहे, परंतु जेथें स्थानिक लँड मॉर्गेज बँका नाहींत तेथील काम हातीं घेण्याची व्यवस्था प्रांतिक लँड मॉर्गेज बँकेनें केली पाहिजे. गोडाउन्स बांधण्यासाठी ५ हजार रुपयांपर्यंत कर्जें सोसायट्यांस द्यावींत असें सरकारनें मागेंच जाहीर केलें आहे.

सोसायट्यांच्या सेक्रेटरीवर होणाऱ्या खर्चाचा कांहीं भाग सरकारनें सोसावा, अशी कमिटीची एक शिफारस आहे. त्यास एक अट घालण्यांत आली आहे. अमर्याद जबाबदारीच्या ह्या सोसायट्यांनीं, सरकारी मदत त्यांस चालू असेपर्यंत, डिव्हिडंड वाटता कामा नये आणि कर्जावरील व्याजाचा दर ६½% पेक्षां जास्त करता कामा नये. पहिलीं दहा वर्षें ही मदत मिळेल.

---

## हिंदी आयुर्विमा व्यवसाय

हिंदी विमा व्यवसायाचा वार्षिक आढावा घेणारा सरकारी अधिकृत अहवाल प्रसिद्ध झाला आहे. १९४६ सालांतील विमा-व्यवसायाबद्दल आंकडेवार माहिती देऊन, नेहमीप्रमाणें ह्या व्यवसायाच्या भवितव्यतेबद्दल अहवालांत चर्चा केलेली आहे. सध्या हिंदुस्थानच्या औद्योगिक उत्पादनांत झालेली घट भरून काढून आर्थिक व्यवहार अधिक वेगानें सुरू झाल्याशिवाय विमा कंपन्यांना १९४६ सालीं केलेली प्रगति चालू ठेवता येणार नाहीं; इतकेंच नव्हे तर, त्याच्यावर आर्थिक संकटेंही कोसळण्याचा संभव आहे, असा स्पष्ट इषारा अहवालांत देण्यांत आला आहे. उत्पादन घटत चाललें तर त्याचा परिणाम विमा कंपन्यांच्या उत्पन्नावर होणें अपरिहार्यच आहे. १९४६ सालीं आयुर्विमा व्यवसाय आणि इतर विमा व्यवसाय ह्यांची प्रगति झाली. १९४५ सालापेक्षां १९४६ सालीं आयुर्विमा कंपन्यांनीं ६ टक्के अधिक धंदा मिळविला; आगीचा व इतर प्रकारचा विमा उतरणाऱ्या कंपन्यांच्या हप्त्यांच्या उत्पन्नांतहि मागील वर्षापेक्षा अनुक्रमें २५ व ६० टक्क्यांनीं वाढ झाली. सध्याच्या चढ्या किंमती आणि युद्धकाळांत मिळालेला पैसा ह्याच्या योगानें कंपन्यांच्या हप्त्यांच्या उत्पन्नांत अजून थोडी फार वाढ होण्याचा संभव असला तरी एकंदरीनें चालूं परिस्थितींत विम्याचें नविन काम आहे ह्यांच पातळीवर रहाणें कठीण आहे. आजच आगामी मंदीचीं पावलें ऐकूं येऊं लागलीं आहेत, असें विधान अहवालांत करण्यांत आलेलें आहे.

कलकत्ता येथें १५ मार्च रोजीं इंडिअन लाइफ इन्शुरन्स ऑफिसेस असोसिएशनचें ३० वें अधिवेशन भरलें होतें. असोसिएशनचे अध्यक्ष पं. ब्रह्मदत्त ह्यांनीं आपल्या भाषणांत आयुर्विमा व्यवसाय खेडोपाडीं नेवून पोंचविण्याची जरूरी प्रतिपादन केली. आतांपर्यंत विमा व्यवसाय मुख्यतः मध्यमवर्गीयापुरताच मर्यादित राहिलेला आहे. आयुर्विम्याचे हप्ते भरण्यासाठीं लागणारा पैसा हुकमी प्राप्तीशिवाय मिळणें कठीण असतें; अर्थातच शहरांतील नोकरी पेशाचा मध्यम वर्गच मुख्यतः विमा पत्रकें घेत असतो. खेडोपाडीं प्राप्तीची अनिश्चितता असल्यानें विम्याचा प्रसार होणें

अवघड जाते. खेडोपाडींच्या विमेदारांचे हप्ते सहकारी सोसायट्यांच्या मार्फत वसूल करण्याची पं. ब्रह्मदत्त ह्यांची कल्पना विचारार्ह आहे.

विमा वार्षिकांत सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुरन्स ह्यांनीं व्यक्त केलेले विचार आणि पं. ब्रह्मदत्त ह्यांनीं व्यक्त केलेले विचार एकमेकास पूरक असेच आहेत. कोणत्याही देशांतील विमा व्यवसाय हा त्या देशांतील आर्थिक घडामोडींपासून अलिप्त राहूं शकत नाहीं. औद्योगिक उत्पादन आणि शेतीचें उत्पादन ह्यांची वाढ होऊन मालाची उलाढाल जितक्या अधिक प्रमाणांत होईल तितक्या प्रमाणांत विमा व्यवसायाला तेजी येईल हें उघडच आहे. पण परिस्थिती मोठी चमत्कारिक झालेली आहे. नव्या युद्धाच्या सावल्यामुळें हिंदुस्थानला परदेशी यंत्र सामुग्री मिळणें कठीण होत चाललें आहे. ती मिळाल्याशिवाय नवीन कारखाने निघण्याची शक्यता नाहीं. जुन्या कारखान्यांतून ह्या ना त्या कारणानें उत्पादन घटत आहे. शेतीच्या मालाला आज चढीचा भाव असला तरी युद्धोत्तर मंदीचा परिणाम त्यावरही केव्हां तरी झाल्याशिवाय रहात नाहीं. अशा परिस्थितींत विमा-कंपन्यांनीं, नवा धंदा फारसा न मिळवला तरी मिळविलेला धंदा विमेदारांचे दृष्टीनें जतन करण्याचे प्रयत्न केले पाहिजेत.

## उद्योगपतींच्या परिषदेंत पं. नेहरूंचें भाषण

हिंदुस्थानचे मुख्य प्रधान पं. जवाहरलाल नेहरू ह्यांनीं फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज, ह्या संस्थेच्या वार्षिक बैठकीपुढें नुकतेंच भाषण केलें. हिंदी अर्थ व्यवस्थेच्या भावी स्वरूपाविषयीं, ध्येयाविषयीं आणि कार्यक्रमाविषयीं हल्लीं बरीच चर्चा चालू आहे. ह्या चर्चेंत मुख्यतः दोन बाजू पडलेल्या दिसून येतात. देशांतील मोठाल्या उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण करावें ह्या मताचा एक पक्ष आहे; तर ह्याच्या उलट खाजगी धंद्याला वाव दिल्याशिवाय उत्पादन वाढणार नाहीं असें म्हणणारा दुसरा पक्ष आहे. पं. नेहरू ह्यांनीं ह्या दोन पक्षांपैकीं कोणालाच संपूर्ण पाठिंबा न देतां, एकंदर उद्योगधंद्यांचे तीन वर्ग केले. पहिल्या वर्गांत तातडतोब राष्ट्रीयीकरण करण्यासारखे उद्योगधंदे येतात, दुसऱ्या वर्गांत सावकाशीनें राष्ट्रीयीकरण करण्यासारखे उद्योगधंदे येतात आणि तिसऱ्या वर्गांत खाजगी मालकीचे रहाण्यासच योग्य असे उद्योगधंदे येतात.

पं. नेहरूंनी केलेलें हें वर्गीकरण मान्य करून सुद्धा, भाषण तपशिलाच्या बाबतींत स्पष्ट नाहीं असें म्हणावें लागतें. पंडितजींनीं पहिल्या वर्गांत जे उद्योगधंदे घातले ते कोणत्या कसोटीनें व कोणते हें स्पष्ट केलेलें नाहीं. राष्ट्रीयीकरणाची मागणी करणाऱ्या पक्षातर्फे असा मुद्दा मांडला जातो कीं भांडवलाचें, उत्पादनाचें व नियंत्रणाचें केंद्रीकरण ज्या धंद्यांत अतिशय झालेलें असतें ते धंदे राष्ट्रीयीकरणाला पात्र झाले असें समजावें. ह्या दृष्टीनें पहातां कापडाच्या गिरण्या, सीमेंटचे कारखाने, लोखंड-पोलादाचे कारखाने, तागाच्या गिरण्या इत्यादी धंदे राष्ट्रीयीकरणाला पात्र आहेत असें ह्या पक्षातर्फे मानण्यांत येतें. हिंदुस्थान सरकार लवकरच आपलें औद्योगिक धोरण जाहीर करणार आहे, त्यावेळीं ह्या प्रश्नांचा अधिक तपशीलवार विचार होणें जरूर आहे. पंडितजींच्या भाषणांतील इतर मुद्यांपैकीं मजुरांच्या असंतोषासंबंधींचें त्यांचें विवेचन आणि ग्रामोद्योगानें उत्पादन वाढविण्याची त्यांची सूचना हीं चिंतनीय आहेत.

## कै. बाबासाहेब साळवेकर

### महाराष्ट्रीय कंपन्यांच्या संवर्धनाचा मोठा आधार

श्री. बाबूराव साळवेकर ह्या नांवानें सुपरिचित असलेले, महाराष्ट्रीय उद्योगधंद्यांस सढळ हातानें मदत करणारे श्री. गजानन विश्वनाथ साळवेकर बी. ए., ह्यांच्या दुःखद व अकाली निधनाची वार्ता ऐकून महाराष्ट्रांतील लिमिटेड कंपन्यांशीं संबंध असणाऱ्या सर्व लोकांना हळहळ वाटल्याविना रहाणार नाहीं. महाराष्ट्रांतील लोक पैशानें अत्यंत गरीब असल्यानें आणि हल्लीच्या मापानें उद्योगधंदे काढण्यास व चालविण्यास पैशाचें पाठबळ मोठें लागत असल्याकारणानें, सुप्रस्थापित लिमिटेड कंपन्यांचा प्रसार होण्यास महाराष्ट्रांत फार मोठा वाव आहे. नव्या उपक्रमांचें स्वरूप लिमिटेड कंपनीच्या प्रकारचेंच रहाणें अपरिहार्य झालें आहे आणि खाजगी मालकीचे धंदेहि लिमिटेड रूप धारण करूं लागले आहेत. महाराष्ट्रामध्यें ज्या काळांत मोठी लिमिटेड कंपनी हें एक नाविन्य होतें अशा काळांत म्हणजे १२-१५ वर्षांपूर्वींच नव्या कंपन्यांच्या स्थापनेस ज्यांनीं हातभार लावून महाराष्ट्रीय उद्योगधंद्यांस चालना दिली, अशा अगदी मोजक्या गृहस्थांमध्यें कै. बाबासाहेब ह्यांची गणना होते. तेव्हांपासून सतत आपल्या मृत्यूपर्यंत, कै. बाबासाहेबांनीं नव्या कंपन्यांचे मोठ्या प्रमाणावर शेअर्स घेऊन आणि त्यांचें संचालकत्व पत्करून महाराष्ट्रीय कंपन्यांच्या संसारांत महत्त्वाचें स्थान प्राप्त करून घेतलें. सर्वांत अधिक महाराष्ट्रीय कंपन्यांचे भाग ते धारण करीत होते आणि आमच्या माहितीप्रमाणें सर्वांत अधिक कंपन्यांचे ते डायरेक्टरहि होते. त्यांच्या संचालकत्वाचा ज्यांस फायदा मिळत असे, अशा कांहीं कंपन्यांची यादी खालीं दिली आहेः—

(१) बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि.
(२) सदर्न प्रिंटिंग वर्क्स लि.
(३) नवयुग चित्रपट लि.
(४) इंडियन प्रोग्रेसिव्ह इं. कं. लि.
(५) महाराष्ट्र इंडस्ट्रिअल इनव्हेस्टमेंटस लि.
(६) डेक्कन टोबॅको वर्क्स लि.
(७) विजय टेक्स्टाइल्स लि.
(८) श्रीराम सिल्क मिल्स लि.
(९) विश्वभारती इं. कं लि.
(१०) न्यू मेट्रो इं. कं. लि.
(११) न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.
(१२) बॉंबे सिल्क फिलेचर्स लि.
(१३) त्रिप्ला कमर्शिअल कं. लि.
(१४) गोवर्धन डेअरी फार्म्स लि.
(१५) महाराष्ट्र इंजिनिअरिंग वर्क्स लि.
(१६) हिंदुस्थान स्पन पाइप्स लि.
(१७) सिरॅमिक अँड ग्लास इंडस्ट्रीज लि.
(१८) सरदारगृह लि.
(१९) स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् लि.
(२०) पूना ऑइल मिल्स लि.

वरील यादीवरून कै. बाबासाहेबांच्या कार्याच्या व्यापाची कल्पना येईल. प्रत्येक कंपनीचे कामकाजांत ते अत्यंत सद्प्रवृत्तीनें लक्ष घालीत, त्यामुळें त्यांचेबद्दल सर्वांसच आदर वाटे. मुंबईच्या महाराष्ट्रीय व्यापाऱ्यानें महाराष्ट्रांतील कंपन्यांच्या संवर्धनांत इतक्या मोठ्या प्रमाणावर भाग घेतल्याची आणखी उदाहरणें फारशीं आढळणार नाहींत. ह्या दृष्टीनेंहि त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणें अगत्याचें आहे.

## प्राप्तीवरील कराबाबत एक महत्त्वाचा निवाडा

### सर सयाजीराव गायकवाड ह्यांच्या नातवांच्या इनकम टॅक्सबाबत निर्णय

कै. सर सयाजीराव गायकवाड, बडोद्याचे महाराज, ह्यांनीं १९०५ सालीं १ कोटी रुपयांचा "रॉयल फॅमिली ट्रस्ट" केला आणि १९२८ सालीं एका "डीड"च्या अन्वयें त्यांत थोडासा फरक केला. ह्या "डीड"च्या ६ व्या कलमाप्रमाणें, प्रिन्स खंडेराव व प्रिन्स उदयसिंहराव ह्यांना ट्रस्टचा प्रत्येकी आठवा हिस्सा मिळावयाचा होता आणि त्यांच्या मातोश्री प्रिन्सेस कमलादेवी ह्यांनाहि ट्रस्टींनीं कांहीं रकम द्यावयाची होती. त्या एका मुलापासून वेगळ्या राहिल्या तर दरसाल ९ हजार रु. त्यांस मिळावे आणि त्या दोन्ही मुलांपासून स्वतंत्र राहिल्या तर त्यांस सालिना १८,००० रु. मिळावे अशी तजवीज होती. १ एप्रिल, १९४१ पासून प्रिन्सेस कमलादेवी दोन्ही मुलांपासून स्वतंत्र राहूं लागल्या आणि नोव्हेंबर १९४२ मध्यें केलेल्या कांहीं दस्ताप्रमाणें प्रत्येक मुलानें आपल्या आईस आपल्या मुंबईमधील मालमत्तेच्या उत्पन्नांतून सालिना १५,००० रु. देण्याचें ठरविलें. ही रकम इनकम टॅक्सच्या दृष्टीनें आपल्या प्राप्तींतून वजा घालावी, असें दोन्ही मुलांचें म्हणणें होतें, तें इनकम टॅक्स अधिकारी व अॅपलेट असिस्टंट कमिशनर ह्यांनीं अमान्य केलें. इनकम टॅक्स ट्रायब्यूनलनें खालील प्रमाणें निवाडा केला:—

"कै. सयाजीराव महाराज ह्यांच्या ट्रस्टप्रमाणें, प्रत्येक प्रिन्सनें प्रिन्सेस कमलादेवींना, त्या दोघांपासूनहि स्वतंत्र राहिल्यास, सालिना ९,००० रु. द्यावयाचें ठरलें आहे. कै. सयाजीरावांनीं केलेल्या कोणत्याच कागदपत्रांत ह्या रकमेपेक्षा जास्त रकम कोठल्याहि प्रिन्सनें द्यावी असें म्हटलेलें नाहीं. म्हणून प्रत्येक मुलानें दिलेले ९,००० रुपये प्राप्तीमधून वजा करता आले तरी प्रत्येक मुलानें आणखी दिलेल्या ६,००० रुपयांवरील इनकम टॅक्स चुकूं शकत नाहीं."

### दि गणेश बँक ऑफ कुरुंदवाड, लि.

"जनतेला पैशाची नड तीव्रतर भासूं लागल्यामुळें डिपॉझिटची मागणी वाढत्या प्रमाणांत दिसून आली. त्याचप्रमाणें सोनें गहाण, माल गहाण व्यवहारावर नेलेले पैशाची ज्या प्रमाणांत उचल झाली, त्या प्रमाणांत परतफेड करण्यास जनतेस पैशाच्या टंचाईमुळें अडचणींचें भासल्यानें बँकेसहि त्याचे परिणाम जाणवल्याशिवाय राहिले नाहींत. त्यांतच तंबाखूचे भाव बेसुमार उतरल्यामुळें त्या मालाची देवघेव कमी आली. त्याचा परिणाम बँकेचा ह्या व्यवहारांत गुंतलेला पैसा तसाच येणें राहिला." तथापि वरील बँकेस ताळेबंदाचे सालीं म्हणजे १९४७मध्यें २०,८१२ रु. निव्वळ नफा झाला; हा नफा सर्वांत अधिक आहे. गणेशवाडी शाखा नुकतीच पुनः सुरू होऊनहि तेथील व्यवहार नफ्याचा आहे.

बँकेचें वसूल भांडवल २८,१०० रु. असून रिझर्व्ह व इतर फंड ८२ हजारांचे आहेत. बँकेकडे ४ लाखांवर रुपयांच्या ठेवी आहेत. बँकेनें ८,७७७ रु. व्याज दिलें व ३४,८०६ रु. व्याज मिळविलें. हुंडी बट्टा व किरकोळ उत्पन्न २,८३३ रु. झालें. अशा रीतीनें, ५ लक्ष, ६५ हजार रु. खेळत्या भांडवलावर बँकेनें सुमारें २१ हजार रु. निव्वळ नफा मिळविला आहे. १२% डिव्हिडंडसाठी ४,५७२ रु. चा विनियोग करून बाकीच्या नफ्याचें वांटप दक्षतेनें व बँकेची मजबुती वाढविण्याच्या दृष्टीनेंच केलेलें आहे. श्री. वामन रामचंद्र साठे, बी. ए., एलएल. बी. (वकील) हे बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. बँकेची वार्षिक सभा ता. ३०-३-४८ रोजीं झाली.

## व्यापार व राजकारण

### अरबांना फ्रेंच दारूगोळ्याचा पुरवठा

पॅलेस्टाइनमध्यें ज्यू लोकांच्या विरुद्ध उपयोगांत आणण्यासाठी अरब लीग ८ कोटी पौंड किंमतीचे रणगाडे व दारूगोळा ह्यांची फ्रान्समध्यें खरेदी करीत आहे. लिबॅनीज लष्कराला लागणारी सामुग्री फ्रान्स नेहमीच पुरवीत आला आहे; त्यांत वावगें असें कांहींच नाहीं, असें एका फ्रेंच जबाबदार अधिकाऱ्यानें नुकतेंच सांगितलें.

### रशियाकडे अमेरिकन युद्धसामुग्रीची निर्गत ?

अमेरिकन रणगाडे व तोफा, 'यंत्रसामुग्री' ह्या लेबलाखालीं रशियाकडे निर्गत होत आहेत, अशी बातमी आहे. तिची चौकशी अमेरिकन सरकार करीत आहे. निर्गतीचे लायसेन्स, पैसे घेऊन दुसऱ्यास विकले जातात आणि त्यांचा उपयोग खोट्या लेबलानें माल निर्गत करण्याकडे केला जातो असा वरील तक्रारींचा आशय आहे.

## नववी प्रांतिक सहकारी परिषद, मुंबई

(जागा: कौन्सिल हॉल, मुंबई)

कार्यक्रम (दररोज सकाळीं ११-३० ते ५-३०)

रविवार, ११-४-१९४८

(१) इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष सर जनार्दन मदन ह्यांचें स्वागतपर भाषण, (२) पंतप्रधान श्री. खेर ह्यांचें उद्घाटनाचें भाषण, (३) परिषदेचे अध्यक्ष सर व्ही. टी. कृष्णमाचारी ह्यांचें अध्यक्षीय भाषण, (४) पंतप्रधानांचे आभार मानणारें भाषण, (५) विषय नियामक कमिट्यांची नेमणूक, (६) विषय नियामक कमिट्यांच्या सभा.

सोमवार, १२-४-१९४८ परिषदेचें खुलें अधिवेशन

स्त्रियांचा विभाग

(१) श्री. हंसा मेहता ह्यांचें स्वागतपर भाषण, (२) हिंद सरकारच्या मंत्री श्री. राजकुमारी अमृत कुवर ह्यांचें उद्घाटनाचें भाषण, (३) उद्घाटकांचे आभार मानणारें, अर्थ-मंत्री श्री. मेहता ह्यांचें भाषण.

मंगळवार, १३-४-१९४८ सहकारविषयक प्रश्नांवर चर्चा

उन्हाळ्याच्या उष्णतेवर

गुलकंद

खडीसाखरेचा, प्रवाळयुक्त, व साधा

श्री धूतपापेश्वर पनवेल लि० पुणें डेपो— सिटी पोस्टासमोर.

# मुंबई प्रांतिक सहकारी परिषद

( लेखकः—श्री. यशवंत दत्तात्रय खोले. )

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूटचे विद्यमानें चालू महिन्याचे दिनांक ११ ते १३ या दिवशीं येथें मुंबई विधिमंडळाचे सभागृहांत प्रांतिक सहकारी परिषद् भरविण्यांत येणार असून त्या परिषदेचें अध्यक्षस्थान सर व्ही. टी. कृष्णमाचारी स्वीकारणार आहेत. उद्घाटन मुंबई सरकारचे पंतप्रधान श्री. बा. गं. खेर यांनीं करण्याचें मान्य केलें आहे. ह्या परिषदेचा एक विभाग स्त्रियांसाठी ठेवला असून त्याचें उद्घाटन. केंद्रीय सरकारच्या आरोग्य खात्याच्या मंत्री, राजकुमारी अमृत कुंवर, यांचे हस्तें होणार आहे.

प्रांतिक सहकारी परिषद् साधारणतः दोन वर्षांचे अंतरानें बोलवण्याचा प्रघात आहे व त्या धोरणास अनुसरून ही परिषद् भरविली जात आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. ह्या परिषदेचे आर्धी विभाग सहकारी परिषदा भरविण्याचा उपक्रम इन्स्टिटयूटनें केल्यानें परिषदेंत येणारे ठराव व चर्चा ह्यांस महत्त्व आहे. १५ ऑगस्टचे राजकीय सत्तादानामुळें देशांत आतां पूर्णपणें आपलें सरकार प्रस्थापित झालें असून सहकारी चळवळीच्या द्वारें आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक प्रगति होण्यास आतां चांगली संधी आहे. त्यांतच हिंदुस्थान सरकारनें नेमलेल्या दोन समित्या म्हणजे सहकारी चळवळीची नियोजन समिती ( ह्यास सरय्या समिती म्हणतां येईल ) दुसरी व शेतकी पतीची पुनर्घटना समिती ( ह्यास गाडगीळ समिती म्हणतां येईल ) ह्यामुळें सहकारी चळवळींतील कार्यकर्त्यांच्या विचारांस चालना देणारे अहवाल उपलब्ध झाले आहेत. त्याचबरोबर प्रांतिक सरकारांनीं, मुख्यतः मुंबई सरकारनें शेतकऱ्यांचे हिताच्या उद्देशानें म्हणून अनेक कायदे केले असल्यामुळें व सहकारी चळवळ व शेतकी समाज यांचे निकट असे संबंध असल्यानें प्रांतिक सहकारी परिषदेस मोठें महत्त्व आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं

### परिषदेपुढील मुख्य विषय

परिषदेपुढें येणाऱ्या विषयांसंबंधीं विचार करतां त्यांमध्यें मुख्यतः पुढील ठोकळ विषय चर्चेस येणार असल्याचें समजतें. ( १ ) सहकारी तत्त्वावर खरेदी विक्री करणाऱ्या संस्थांचे मध्यवर्ती खरेदी विक्री संस्थेशी निकट संबंध कसे असावेत. ( २ ) सरकारच्या लायसेन्सड कोठार योजनेंत कसा भाग घ्यावयाचा. ( ३ ) विनियंत्रणामुळें ग्राहक संस्थांची पुनर्घटना. ( ४ ) सहकारी चळवळीवरील सरकारी नियंत्रण कमी करणेबाबत प्रांतिक रजिस्ट्रार यांचे परिषदेंत झालेले ठराव. ( ५ ) विधिमंडळांत सहकारी चळवळीचें प्रतिनिधित्व. ( ६ ) सोसायटयांवरील देखरेख, त्याच्या खर्चावर नियंत्रण. (७) सहकारी मध्यवर्ती मंडळ, त्याचे कार्य व घटना. ( ७ ) घरें बांधण्यासाठी लागणारा पैसा कसा व कोणी पुरवावा ( शहरासाठीं व खेडेगांवासाठीं ). ( ८ ) औद्योगिक सहकारी संस्थांसाठी स्वतंत्र प्रांतिक पैसा पुरविणारी संस्था असणें जरूर आहे काय ? ( ९ ) सहकारी तत्त्वावर शेती करण्याचा कार्यक्रम.

परिषदेच्या चालकांनी निवडलेले विषय सहकारी चळवळीचे दृष्टीनें फार महत्त्वाचे आहेत असेंच कोणीहि म्हणेल. पुणें येथें १९४८ च्या जानेवारीमध्यें महाराष्ट्र विभाग परिषदेच्या अध्यक्षीय भाषणांत सहकारी संस्थांच्या यशस्वितेला आवश्यक अशा पार्श्वभूमिसंबंधीं श्री. ध. रा. गाडगीळ म्हणतात; “ आपल्या अहवालाच्या पहिल्या प्रकरणांत सरैय्या समितीनें सहकारी संस्थांच्या यशस्वितेला आवश्यक अशी पार्श्वभूमि काढिली आहे. सहकारी चळवळीच्या वाढीस अनुकूल परिस्थितीचीं तीन लक्षणें समितीनें सांगितलीं आहेत. एक लोकशाही सरकार, आणि दुसरें शैक्षणिक प्रगती; पण सर्वांहून महत्त्वाचें, विशेष विस्तारानें व आग्रहानें मांडलेलें तिसरें लक्षण अनिर्बंध व्यवहारांचा शेवट व शेतीमालाच्या किंमती इत्यादी बाबत सरकारचा सक्रिय पाठिंबा. ” वरील उतारा महत्त्वाचा असल्यानें मुद्दाम वर दिला आहे. अलीकडे जनता व सरकार समाजाचे सर्व व्यवहार सहकारी चळवळीमार्फत व्हावेत असें आग्रहानें म्हणत असतां त्यास लागणारी अनुकूल परिस्थिती निर्माण करण्याचें कार्य व्हावें तसें समाधानकारक होत नाहीं. सहकारी चळवळीसंबंधी माहिती व सहकारी संस्थांचे व्यवहार जाणण्यास शैक्षणिक प्रगति जेवढी झपाट्यानें होईल तेवढी आवश्यक आहे, आणि या दृष्टीनें विचार करतां निदान सहकारी चळवळींत समाविष्ट असलेली सर्व जनता साक्षर करण्याचा प्रयत्न झाल्यास तो योग्यच होईल.

### खरेदी-विक्रीची सहकारी पद्धतीनें संघटना

वर उल्लेख केलेल्या विषयांत खरेदी विक्री व्यवहारासंबंधीं निकट संबंध मध्यवर्ती संस्थेशी कसा आणावा व विनियंत्रणामुळें ग्राहक संस्थांची पुनर्घटना कशी करावी हा एक विषय आहे. सहकारी खात्याचें धोरण असें आहे कीं शक्य तेवढ्या विविध कार्यकारी संस्था अस्तित्वांत आणून शिवाय तालुकानिहाय खरेदी विक्री संघ व जिल्ह्यासाठी जिल्हा खरेदी विक्री संघ अस्तित्वांत नसल्यास आणण्याचा प्रयत्न करणें व त्यामार्फत शेती मालाची खरेदी-विक्री करणें व शेतकऱ्यास उपयुक्त असा माल देणें. ऋण विमोचन कायदा व पीक कर्ज यामुळें हा व्यवहार बराच वाढेल अशी अपेक्षा होती, परंतु मध्यंतरी सर्व धान्य सरकार खरेदी करत असल्यामुळें यांत करण्यासारखें काम नव्हतें. तथापि नियंत्रित मालाची वाटप पद्धति वरील संस्थांमार्फत करण्याचा सरकारी विचार करून त्याप्रमाणें व्यवस्था केली. परंतु यांतही सुसंबद्ध असें धोरण नसल्यामुळें व नियंत्रित मालाच्या पुरवठ्याची अनिश्चितता यामुळें हा व्यवहार फारसा समाधानकारक होत नाहीं. प्रचाराचे सहाय्यानें व कदाचित कायद्यानें आवश्यक करून सोसायटीच्या सभासदांचा माल वरील सहकारी संस्था मार्फत विकला गेला पाहिजे. अशी व्यवस्था असल्याशिवाय सहकारी तत्त्वावरील खरेदीविक्रीचा व्यवहार यशस्वी होणार नाहीं आणि सर्वांहून महत्त्वाचा प्रश्न म्हणजे मालाच्या निश्चित किंमती असणें होय. सहकारी संस्था तेजीमंदीचा व्यवहार करणें शक्य नाहीं व जोपर्यंत बाजारभाव स्थिर नाहीं तोपर्यंत खरेदीविक्री व्यवहार करणें सहकारी संस्थांस धोक्याचें आहे. त्याचबरोबर सरकारनें अधिकृत अशी गुदामें उपलब्ध करून मालाची प्रतवारी व त्यास आवश्यक अशी वाहतुक याची योजना केली पाहिजे.

### देखरेख व नियंत्रण

युद्धकाळांत केवळ नियंत्रणाचे योजनेमुळें अस्तित्वांत आलेल्या ग्राहक संस्थांची आतां निराशाजनक स्थिति झाली आहे. अनिर्बंध मालाच्या किंमती व वांटप यामुळें सहकारी संस्थांस अवश्य असणारी सभासदांची निष्ठा ढळमळूं लागली आहे. सहकारी

ग्राहक संघ यशस्वी होण्यास सभासदांमध्यें निष्ठा अढळ राहिली पाहिजे तरच त्या यशस्वी होऊं शकतील.

परिषदेमध्यें शेतकी पतपेढ्यांच्या जिव्हाळ्याचा असा एक प्रश्न चर्चिला जाईल. तो म्हणजे सोसायट्यांवरील देखरेख, त्याचा खर्च व नियंत्रण हा होय. सोसायट्यावरील देखरेखीचा प्रश्न सन १९२९ सालापासून चर्चिला जात असून त्याबाबत अद्याप समाधानकारक असा निर्णय होऊं शकत नाहीं, ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट आहे. संस्थांवरील देखरेख दोन प्रकारची. एक सहकारी खात्याची व दुसरी सहकारी संस्थांच्या प्रतिनिधींची सामुदायिक. सहकारी खात्याची देखरेख मुख्यतः त्यांच्या हिशेबतपासनीसाच्याबाबत तर प्रतिनिधींची मार्गदर्शक. परंतु सरकारच्या अनिश्चित अशा धोरणामुळें निमसरकारी देखरेखीबाबत फारच असमाधान दिसून येतें. निमसरकारी देखरेख युनिअननें नेमलेल्या सुपरवायझरमार्फत होत असे व त्यांच्या खर्चाकरितां लागणारी रक्कम सहकारी संस्थांकडून वर्गणीरूपानें वसूल केली जात असे व येणारी तूट सरकार आर्थिक मदत देऊन भरून काढीत असें. ही गोष्ट खरी कीं, युनिअनमध्यें कांहीं दोष होते. परंतु ते दोष काढण्याचे हेतूनें व सहकारी संस्थांवरील आर्थिक बोजा कमी करण्याचे हेतूनें सरकारनें सुमारें दोन वर्षांपूर्वीं सर्व देखरेखी अंमलदार आपले हुकमतखालीं घेतले. मुंबई सरकारनें सन १९३३ सालीं सोसायट्यांवरील देखरेखीबाबत एक समिती नेमली होती व त्यामध्यें मुंबई प्रांताचे सध्यांचे अर्थ व सहकारी मंत्री श्री. मेहथा व कै. प्रो. वा. गो. काळे यांनीं देखरेखीसंबंधीं आपला स्पष्ट मुद्दा मांडून सोसायट्यांवरील देखरेख निमसरकारी अशा मध्यवर्ती प्रांतिक इन्स्टिट्यूटकडे द्यावी, असें विशद करून, सहकारी चळवळीमध्यें इन्स्टिट्यूटचें स्थान किती महत्त्वाचें आहे व त्यांचे मतें सहकारी शिक्षण, प्रचार यशस्वी होण्यास सहकारी प्राथमिक संस्थांच्या दैनंदिन कारभारावर देखरेख ठेवण्याचें काम इन्स्टिट्यूटकडे ठेवणें आवश्यक आहे असें म्हटलें होतें. या समितीचे दुसरें सभासद व मुंबई सरकारचे माजी अर्थमंत्री श्री. लठ्ठे यांनीं वरील शिफारशीस महत्त्व असल्याचें सांगून जिल्ह्यांतील सहकारी चळवळीचा सर्वांगीण व एकमेव असा विचार होऊन त्याप्रमाणें पुनर्घटना होण्याची जरूरी असल्याचें प्रतिपादन केलें आहे. आमचे मतें या परिषदेमध्यें सोसायट्यांची देखरेख कशी असावी, ती कोणाकडून व कशा पद्धतीनें व्हावी, तसेंच ती कार्यक्षम व सहकारी चळवळीस पोषक होईल व सोसायट्यांचे प्रतिनिधी यांना आपले हक्कावर आक्रमण होणार नाहीं या दृष्टीनें विचार होणें आवश्यक आहे. आजची सुपरवायझर व युनिअन यांची परिस्थिति व परस्पर-संबंध हे सलोख्याचे असावेत तसे नाहींत, हें दृष्टीआड करून चालणार नाहीं.

## शेतकी पतीची पुनर्घटना

सरैय्या समितीनें एक प्रांतिक सहकारी कौन्सिल असावें असें आपल्या शिफारशींमध्यें सुचविलें असून त्याबाबत विचार परिषदेमध्यें होणार आहे. प्रांतामधील सहकारी चळवळीचें धोरण ठरवून नियोजन करणें व सहकारी चळवळीच्या प्रगतीबाबत पुढाकार घेणें हीं कामें या कौन्सिलकडे राहणार आहेत. या प्रश्नासंबंधी विचार होऊन त्याची घटना व कार्य यासंबंधी योग्य तो विचार परिषदेमध्यें होईल. याशिवाय, सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या हौसिंग सोसायट्यांना लागणारा पैसा कसा पुरवणें, औद्योगिक सहकारी संस्थांना भांडवल पुरविणारी स्वतंत्र प्रांतिक बँक असावी किंवा कसें, त्याचप्रमाणें सहकारी तत्त्वावर शेतीसाठी कार्यक्रम ठरविणें याही विषयांचा विचार होणार आहे. प्रांतिक परिषदेमध्यें शेतकी पतपद्धीच्या पुर्नघटनेसंबंधी विचार होईल असें कार्यक्रम पत्रिकेवरून दिसत नाहीं. कदाचित् यासंबंधी सरकारनें आपला अभिप्राय नुकताच प्रसिद्ध केला असल्यामुळें व याबाबत जिल्हा बँकांच्या प्रतिनिधींची मतें अजमाविलीं असल्यामुळें या विषयाचा विचार होण्याची जरूरी राहिली नसेल. परंतु शेतकी पतीच्या पुर्नघटनेच्या व सहकारी चळवळीच्या एकंदर कार्यांत यामुळें महत्त्वाचा असा फरक होत असल्यामुळें या प्रश्नाचा प्रांतिक परिषदेमध्यें विचार होणें जरूर आहे असें आम्हास वाटतें. नानावटी समितीच्या शिफारशीप्रमाणें पतवाल्या शेतकऱ्यांस लागणारा सर्व पैसा सहकारी संस्थामार्फत पुरविला जाणार असून, त्यामुळें जिल्हा बँका व प्रांतिक बँका यांचे संबंध, शेतकी पतपेढ्यांवर यामुळें येणारी नवीन जबाबदारी, सोसाट्यावरील देखरेखीबाबत त्या समितीनें सुचविलेले विचार महत्त्वाचे असल्यानें व त्याचा परिणाम भावी सहकारी चळवळीवर होणार असल्यामुळें या प्रश्नांस परिषदेमध्यें योग्य असें स्थळ मिळावें हें योग्यच होईल.

## आढावा घेऊन कार्यक्रम आखा

सहकारी चळवळीसंबंधी अद्याप बऱ्याच कार्यकर्त्यांची निराशा आहे आणि ह्यास कारणें म्हणजे जनतेमध्यें असावी तितकी निष्ठा नाहीं. सहकारी खात्यांतही असावा तितका उत्साह नाहीं व याचा परिणाम म्हणजे सहकारी संस्थांच्या कार्यांत शैथिल्य आलें आहे. कार्यकर्ते उपलब्ध झाले तरी ते फार काळपर्यंत चळवळीमध्यें प्रतिकूलपरिस्थितीमुळें कार्य करूं शकत नाहींत. सहकारी चळवळीची प्रगति होऊन ती जर खरोखर लोकोपयोगी व्हावयाची असेल तर सहकारी चळवळीबाबत निमसरकारी कार्यकर्त्यांबरोबर विचार-विनिमय करून सर्वांगिण असा एक कार्यक्रम आंखणें जरूर असून त्याची अंमलबजावणी यशस्वी होण्याच्या दृष्टीनें वातावरणही निर्माण व्हावयास पाहिजे. या दृष्टीनें परिषद् चालकांस आम्हांस असें सुचवावेसें वाटतें कीं त्यांनीं यासंबंधी एक ठराव करून सरकारास विनंती करावी कीं सहकारी चळवळीचा आजपर्यंतचा आढावा घेऊन त्यांत कोणते दोष आहेत व ते दूर करून सहकारी चळवळ सर्व दृष्टीनें लोकोपयोगी होऊन खंबीर पायावर कसें काम करूं शकेल यासंबंधीं विचार करण्याकरितां व त्याप्रमाणें नियोजनपूर्वक कार्यक्रम आखण्यासाठी सरकारनें एक समिति नेमावी असा ठराव करावा. आज सरकारनें अनेक कायदे केले आहेत कीं ज्यांचा अप्रत्यक्ष संबंध सहकारी चळवळीशीं आहे. परंतु त्यामुळें कार्यांत ज्या अनेक अडचणी आल्या आहेत त्यांचा विचार करण्यासाठीं वरील प्रमाणें समितीची आवश्यकता आहे असें आम्हांस वाटतें. नियोजनपूर्वक कार्यक्रम न आखल्यास सहकारी चळवळीवरील सरकारी खर्च होणारा पैसा आज जरी योग्य वाटत असला तरी परिणामी तो व्यर्थ असा होऊं नये अशी दक्षता घेणें योग्य आहे असें वाटतें. आम्हांस अशी आशा आहे कीं प्रांतिक सहकारी परिषदेमध्यें सहकारी चळवळीच्या आजच्या परिस्थितीबद्दल योग्य तो विचार होऊन भावी कार्यासंबंधी मार्गदर्शन होईल.

---

**हिंदुस्थानांतील पेटंटस्**——हिंदुस्थानांत दरवर्षी सरासरी ८०० पेटंटसूचे खास हक्क त्या त्या शोधकाला देण्यांत येतात. अमेरिकेचें पेटंट्सचे वार्षिक सरासरी प्रमाण ४० हजार आहे. झेकोस्लोव्हाकिआंत दर १० लाख लोकामागें १,००० पेटंट्सचे हक्क दिले जातात. हिंदुस्थानांत हेंच प्रमाण अवघे २ आहे. सर्वांत महत्त्वाची गोष्ट अशी कीं हिंदुस्थानांत दिल्या जाणाऱ्या ह्या हक्कांपैकीं ९० टक्के हक्क परकीय देशाचे नागरिक घेतात.

## गिरणी मालकांच्या तक्रारी

### कामगारांच्या भरमसाट मागण्या—भिऊन मागणार नाहीं—इंडस्ट्रिअल कोर्टाविरुद्ध आक्षेप

"गिरणी कामगारांच्या मागण्या भरमसाट आहेत. त्यांना १९३९ सालाच्या किंमतीच्या मापानें किमान ५० ते ५५ रुपये दरमहा वेतन पाहिजे आहे. रहाणीच्या खर्चाचें मान आतां तिप्पट झालें आहे. म्हणजे, कामगारांची मागणी पुरी करावयाची म्हटल्यास त्यांना दरमहा १५० रु. वेतन दिलें पाहिजें. गेल्या वर्षी मुंबईमधील कामगारांना दरमहा सरासरीनें ८० रु. मिळाले. ह्याचा अर्थ प्रत्येक कामगारास आणखी ७० रु. दिले पाहिजेत. एका वर्षाचा हिशेब केला, तर ह्या जादा वेतनाची रक्कम १६ कोटी, ८० लक्ष रुपये होते; परंतु सगळया गिरण्यांना मिळूनहि गेल्या सालीं ७½ कोटी रुपये सुद्धां नफा झालेला नाहीं.

"१९४६ पेक्षां १९४७ साल हिंदी गिरण्यांस वाईट गेलें. गेल्या वर्षी कामगारांना २ कोटी, ५७ लक्ष रुपये वेतन अधिक मिळाले. महागाई भत्ता ९० लक्ष रुपयांनीं वाढला आणि बोनसचे २ कोटी, ७० लक्ष रुपये जादा मिळाले. गिरण्यांचा नफा मात्र १२¾ कोटी रुपयांवरून ७½ कोटी रुपयांवर आला. संपाचें पिस्तुल दाखविणाऱ्या कामगारांच्या मागण्यांना भिऊन त्यांच्या सर्व मागण्या मान्य करीत जाण्यानें औद्योगिक शांतता मिळणार नाहीं व टिकणार तर खासच नाहीं.

"इंडस्ट्रिअल कोर्टाच्या निवाड्यांवर हायकोर्टाकडे किंवा फेडरल कोर्टाकडे अपील करण्याचा अधिकार असणें आवश्यक आहे. त्यामुळें आर्बिट्रेटर्स व ॲडज्युडिकेटर्स ह्यांच्या, मर्यादेबाहेर जाण्याची प्रवृत्तीस आळा बसेल. त्यांना उद्योगधंद्यांची पूर्ण माहिती नसते आणि तिच्या प्रश्नांचें त्यांस आकलनहि होत नाहीं. मोठाल्या रकमांचे हितसंबंध निगडित असलेले प्रश्न कसेबसे हाताळले गेल्यानें देशाच्या आर्थिक संसारावर त्याचे दूरगामी परिणाम होत आहेत.":—मुंबई गिरणी मालक संघाचे अध्यक्ष, श्री. भगवानदास, सी. व्ही. मेथा ह्यांचें संघाच्या वार्षिक सभेंत भाषण.

### शिंगरे रुग्णालयाचा अहवाल

श्री. म. व्यं. उर्फ काकासाहेब शिंगरे ह्यांनीं खेडेगांवांतील प्रजाजनांच्या उपयोगासाठीं शिरवळ येथें बरीच मोठी रक्कम खर्चून एक रुग्णालय काढलें व तें चालविण्याचीहि जबाबदारी पत्करली. त्याचा उद्घाटन समारंभ २-१-४७ रोजीं डॉ. गिल्डर ह्यांचे हस्तें झाला. बहुजन समाजाचें सहकार्य व धनिकांचे आर्थिक सहाय्य एकत्रित करून रुग्णालय चिरस्थायी करण्याची श्री. काकासाहेबांची कल्पना होती. परंतु ता. ५-२-४८ रोजीं शिंगरे रुग्णालय जाळपोळीच्या धामधुमींत नष्ट झालें ! २-१-४७ ते ५-२-४८ चा रुग्णालयाचा अहवाल आमचेकडे आला आहे, त्यावरून १२५ खेड्यांतील १०,७५० रुग्णांनीं रुग्णालयाचा फायदा घेतला असें दिसून येतें. रुग्णालयाचा नाश झाला असला तरी श्री. काकासाहेब ह्यांची लोकहिताची व सामाजिक कार्याची कळकळ कायम आहे, व पुढें कसें पाऊल टाकावें ह्याबाबत त्यांचा विचार चालू आहे, ही अत्यंत अभिनंदनीय गोष्ट होय. लोकोपयोगी रुग्णालय पुनः चालू करण्याचा त्यांचा मनोदय पार पडण्यास आवश्यक ती परिस्थिति लवकर प्राप्त होईल अशीच अपेक्षा आहे.

### गांधीजींच्या नांवाचा दुरुपयोग

"कित्येक जाहिरातदार म. गांधींच्या विषयीं आदर व्यक्त करण्याचा आव आणून त्यांच्या नांवाचा आपल्या जाहिरातींतून उल्लेख करतात. त्यांचा खरा उद्देश आपल्या मालाचा प्रचार करणें, हाच असतो. त्यांचा मालहि पुष्कळ वेळ असा असतो, कीं जो वापरणें गांधीजींना नापसंत व देशद्रोही वाटलें असतें. तेव्हां व्यापारी वर्गानें अशा रीतीनें गांधीजींच्या नांवाचा दुरुपयोग करण्याचें तात्काळ बंद करावें.":— गांधी राष्ट्रीय स्मारक निधीचे अध्यक्ष, आचार्य कृपलानी, ह्यांची जाहीर विनंति.

### सट्टेबाजीमुळें ३ लक्ष रुपयांचा अपहार ?

बँक ऑफ बिकानेरच्या जोधपूर शाखेच्या मॅनेजरनें २,९४,००० रु. घेऊन पोबारा केल्याचा आरोप आहे. मी रजेवर जात आहे, असें त्यानें कॅशिअरला सांगितलें. कॅश बॉक्सच्या किल्ल्या त्यानें कॅशिअरकडे पाठविल्या, परंतु रकम मोजून पाहतां २,९४,००० रु. कमी आढळले. "मी ही रकम सट्टेबाजींत घालविली" असें मॅनेजरनें एका चिठ्ठींत लिहून ठेवलें आहे, असा पोलिस रिपोर्ट आहे.

### सुंदर सिरॅमिक्स लि. चें उद्घाटन

सुंदर सिरॅमिक्स लि. (बेळगांव) चें उद्घाटन तिच्या लोंढा येथील फॅक्टरीमध्यें मुंबई प्रांताचे उद्योगमंत्रि श्री. तपासे ह्यांचे हस्तें बुधवार, ता. ७ एप्रिल रोजीं होणार आहे. कंपनी सध्यां रिफाइन्ड चायना क्ले, फायर क्ले, फायर ब्रिक्स, इत्यादींचें उत्पादन करीत असून लवकरच ती ग्लास मेल्टिंग क्रुसिबल्स, वेगवेगळया प्रकारची कांच, कांचसामान, इनामल सामान, डिस्टेंपर इत्यादींचें उत्पादन हातीं घेणार आहे. श्री. केशवराव गाखले हे कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.


**मुदलियार ॲंड मुदलियार**

**बिझिनेस व सेल्स ऑर्गनायझर्स**

११५४ शंकरशेट रोड, पुणें २.

आम्ही कोणत्याही मालाचा उठाव तूर्त महाराष्ट्र आणि कर्नाटक करितां गॅरंटीनें करून देऊं. सध्यां डॉ. गोवंडे ज्वरबिंदू डेपो व मॉर लॅबोरेटरीज यांचें काम आम्ही हातीं घेत आहोंत. चलाख व होतकरू तरुणांना आम्ही कॅनव्हसिंगचें शिक्षण देऊन तयार करणार आहोंत.








हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.